**निशाणी क्र १ वरील आदेश**

अर्जदार यांनी सदरचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये होंडा कंपनीची ACTIVA 6G DLX गाडी ज्याचा नोंदणी क्रमांक **एम.एच. १३/ईए–९१४५** असुन **चेसिस क्रमांक ME4JF91AKNG418760** व **इंजिन क्रमांक JF91EG7419081** असा आहे याचा ताबा मिळणे कामी केलेला आहे. अर्जदार यांचे कथन की, अर्जदार सदर वाहनाचे मालक आहेत. सदरचे वाहन राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस क्र.३, ता. माळशिरस, जि. सोलापूर तर्फे एक्साईज पोलीस स्टेशन टेंभुर्णी ता. माढा यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(अ) व (ई) अन्वये दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्र ५७/२०२६ मध्ये जप्त केलेली आहे. अर्जदार यांचे कथन की, सदरचे वाहन हे एकाच जागी पडून राहिल्यास सदर वाहनाचे स्पेअरपार्ट गंजण्याची शक्यता असून अर्जदाराचे अतोनात असे नुकसान होईल. त्यामुळे, अर्जदाराने सदरचे वाहन त्याच्या ताब्यात पुर्ववत देण्यांत यावे अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जास तपासी अंमलदार व सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविले होते. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक ६ वर दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र. ५ वर म्हणणे दिलेले आहे. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त वाहन अर्जदार यास परत केल्यास त्यामध्ये बदल, हस्तांतर अथवा त्याची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच अर्जदाराने वाहनाचे मालकीबाबतचे मुळ कागदपत्रे दाखल केलेली नाहीत असे कथन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांचे सुविद्य विधिज्ञ श्री. आर. आर. चव्हाण आणि विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठार्थ त्यांचे शपथपत्र निशाणी क्र ४ वर दाखल केले आहे. अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या वाहन नोंदणी पुस्तक (आर सी बुक) ची प्रत, राज्य उत्पादन शुल्क यांच्या एफआयआरची झेरॉक्स प्रत व आधार कार्डची

प्रत याचे अवलोकन केले असता जप्त वाहन अर्जदार यांचे नावे असुन जप्त वाहनाची वैधता ०२/१२/२०३७ असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, अर्जदार जप्त वाहनाचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

५. प्रस्तुत प्रकरणात जप्त वाहनाचे मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. सदर जप्त वाहन राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस क्र. ३, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे प्रस्तुत गुन्हयात तपासी अंमलदार यांच्या ताब्यात असल्याचे कथन तपासी अधिकारी आणि अभियोग पक्षाने नाकारलेले नाही. सदर जप्त वाहन राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस क्र. ३ यांच्या आवारात विनापरवाना ठेवल्यास सदर वाहनाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन अर्जदार हे सदर जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने तपासी अंमलदार आणि अभियोगपक्षाने घेतलेल्या आक्षेपांची काळजी योग्य त्या अटी व शर्ती अर्जदारावर लावुन घेतली जावू शकते. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर जप्त वाहन खालील अटी व शर्तीवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे न्यायोचित होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश–

## आदेश

| | |
|---|---|
| १) | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २) | तपासी अंमलदार, राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस क्र.३, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांना आदेशीत करण्यात येते की, गुन्हा रजिस्टर क्रमांक ५७/२०२६ मध्ये जप्त ACTIVA 6G DLX गाडी ज्याचा नोंदणी क्रमांक **एम.एच. १३/ईए–९१४५** असुन **चेसिस क्रमांक ME4JF91AKNG418760** व **इंजिन क्रमांक JF91EG7419081** असा आहे हे वाहन अर्जदार यांचे अंतरिम ताब्यात अर्जदार यांचे रक्कम रुपये १,००,०००/– (एक लाख रुपये) चे हमीपत्र घेऊन खालील अटींवर देण्यात यावे. |
| अ) | अर्जदार यांनी सदर वाहनाच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल करु नये. |
| ब) | अर्जदार यांनी सदर जप्त वाहन न्यायालय, तपासी अंमलदार आदेशीत करतील तेव्हा हजर ठेवावे. |

| | |
|---|---|
| क) | अर्जदार यांनी सदर वाहनाचा अंतरिम ताबा मिळाल्यानंतर वाहनाचे विम्याबाबतची कागदपत्रे १५ दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. |
| ड) | अर्जदार यांनी सदरचे जप्त वाहन कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये. |
| इ) | अर्जदार यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत सदर जप्त वाहनाचा वापर अशाप्रकारच्या व इतर कोणताही गुन्हा करण्यासाठी करु नये. |
| ई) | अर्जदार यांनी वरील अटीवर शर्तीचा भंग केल्यास वाहन पुन्हा जप्त करण्यात येईल. |
| ३) | अर्जदाराने बंधपत्र / हमीपत्र तपासी अधिकारी राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचेकडे द्यावे. |
| ४) | तपासनीस अंमलदार, राज्य उत्पादन शुल्क, माळशिरस क्र.३, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांनी सदर जप्त वाहनाचा सद्य परिस्थिती बाबत सविस्तर पंचनामा करावा. तसेच सदर जप्त वाहनाचे चारही बाजुने रंगीत फोटो घ्यावेत आणि सदर पंचनामा, रंगीत फोटो आणि अर्जदाराने स्वत: च्या नावे वाहन नोंदणी केले बाबतचे कागदपत्रे न्यायालयात दोषारोपपत्रासोबत दाखल करावे. |

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.03.18 16:35:05 +0530

दिनांक – १७/०३/२०२६

**(अनय ज्ञा. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र ३), माढा.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 17/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 18/03/2026 |